। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001
Grade-B(2.88)
NAAC Re-Accredited
रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

**NMU/IDEAL/२२/४३४/२०१५** दि.०३/०१/२०१५

प्रति,

आयडीयल प्रवेशित पदवी व पदव्यूत्तर विद्यार्थी

**विषय :- संपर्क सत्रात उपस्थितीबाबत...**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इन्स्टिटयुट ऑफ डिस्टन्स एज्युकेशन अँड लर्निंग (आयडीयल) या दूरशिक्षण विभागाद्वारे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, आपण ज्या केंद्रावर प्रवेश घेतलेला आहे त्यानुसार संपर्क सत्र डिसेंबर २०१४ अखेर दर रविवारी सुरु झाले असून विद्यार्थ्यांनी संपर्क सत्रासाठी उपस्थित रहावे. विषयनिहाय आपणास जानेवारी २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यानंतर अध्ययन साहित्याच्या सी.डी. उपलब्ध करुन दिल्या जातील. सी.डी. बाबतच्या सूचना यापूर्वीही आपण आयडीयलच्या संकेत स्थळावर प्रसारीत केल्या आहेत. अभ्यासकेंद्रनिहाय प्रवेश यादी आयडीयलच्या संकेत स्थळावर टाकली आहे. त्यानुसार आपण आपले नाव व्यवस्थीत आले आहे का हे तपासून त्यात काही त्रुटी असल्यास आयडीयल विभागास त्वरीत कळवावे.

**महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे येथे प्रवेशित एम.ए. मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व एम.कॉम. या विषयांच्या विद्यार्थ्यांचे संपर्कसत्र शारदा एज्युकेशन संस्थेचे विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे येथे आयोजीत करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी सदर महाविद्यालयात दर रविवारी संपर्कसत्रासाठी उपस्थित रहावे.**

**एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदूरबार धुळे येथे प्रवेशित एम.ए. मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयांच्या विद्यार्थ्यांच्ये संपर्कसत्र ट्रायबल एज्युकेशन ट्रस्टचे महिला महाविद्यालय, नंदूरबार येथे आयोजीत करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी सदर महाविद्यालयात दर रविवारी संपर्कसत्रासाठी उपस्थित रहावे.**

**धुळे येथे प्रवेशित एल.एल.एम. विद्यार्थ्यांचे संपर्क सत्र हे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे येथे होईल.**

**टिप : १. एम.ए. शिक्षणशास्त्र, एम.बी.ए., एम.एस्सी (गणित), एम.ए. संरक्षणशास्त्र या विषयांचे संपर्क सत्र आयडीयल, उमवि, जळगाव येथेच होतील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**२. ज्या अभ्यासकेंद्रावर शिक्षणक्रम निहाय विद्यार्थी संख्या किमान ०५ व पुढे असेल त्याच विद्यार्थ्यांचे नाव संबंधित अभ्यासकेंद्रावर राहील अन्यथा त्यांची नावे आयडीयल अभ्यासकेंद्रावर वर्ग केली जातील याची नोंद घ्यावी.**

**संचालक**
इन्स्टिटयुट ऑफ डिस्टन्स
एज्युकेशन अँड लर्निंग (IDEAL)